दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
dainiklokaarambh@gmail.com
बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | गुरुवार २० फेब्रुवारी २०२५ | अंक ७३ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

छोटी –छोटी बातों से रिश्ते नहीं तोड़े जाते बल्कि रिश्तों को और मज़बूत बनाये ।




# देवेंद्र फडणवीस यांच्याबाबत मनोज जरांगे यांचं पहिल्यांदाच मोठं विधान

## नेमकं काय म्हणाले मनोज जरांगे?

मंगळवारपर्यंत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आरक्षणाचा तिढा सोडवतील, त्यांच्या स्वागतासाठी आम्ही तयार आहोत, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. दरम्यान भाजप आमदार सुरेश धस यांनी मंत्री धनंजय मुंडे यांची भेट घेतली होती, या भेटीनंतर राजकीय वर्तुळात चर्चेला चांगलंच उधाण आलं. मनोज जरांगे पाटील यांनी देखील या भेटीवरून सुरेश धस यांच्यावर जोरदार टीका केली होती. त्यानंतर आता या भेटीबाबत बोलताना त्यांनी मोठं वक्तव्य केलं आहे.

## मंगळवारपर्यंत फडणवीस आरक्षणाचा तिढा सोडवतील!

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी मोठा लढा उभारला, त्यांच्या आंदोलनानंतर सरकारने मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण दिलं. मात्र आम्हाला ओबीसीमधूनच आरक्षण पाहिजे या आपल्या मागणीवर अजूनही मनोज जरांगे पाटील ठाम आहेत. यावर बोलताना त्यांनी आता मोठं वक्तव्य केलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मंगळवारपर्यंत आरक्षणाचा तिढा सोडवतील, आम्ही त्यांच्या स्वागतासाठी तयार आहोत, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. त्यामुळे आता मंगळवारपर्यंत हा तिढा सुटणार का? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे मंगळवारपर्यंत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आरक्षणाचा तिढा सोडवतील, त्यांच्या स्वागतासाठी आम्ही तयार आहोत, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. दरम्यान भाजप आमदार सुरेश धस यांनी मंत्री धनंजय मुंडे यांची भेट घेतली होती, या भेटीनंतर राजकीय वर्तुळात चर्चेला चांगलंच उधाण आलं. मनोज जरांगे पाटील यांनी देखील या भेटीवरून सुरेश धस यांच्यावर जोरदार टीका केली होती. त्यानंतर आता या भेटीबाबत





बोलताना त्यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. सुरेश धस यांच्यावर आमचा मोठा विश्वास होता, त्यांच्यावर दबाव असल्यामुळे त्यांनी धनंजय मुंडे यांची भेट घेतल्याचा दावा जरांगे पाटील यांनी केला आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, देवेंद्र फडणवीस पूर्वी चांगले होते, ते ऐकायचे, परंतु आता ते कोणाचं ऐकतात हे लक्षात येत नाही. त्यांना सांगणा-यांची संख्या जास्त झाली आहे. माणसं मागं घेऊन फिरणारा मी नाही. मी मराठा समाजासाठी काम करतो. यापूर्वीही माझ्या पाठीमागे मराठा समाज होता, आताही आहे. कोणी जर म्हणत असेल माझ्या मागे लोक नाहीत तर त्याने मला काहीही फरक पडत नाही, असं जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. अजितदादा म्हणाले होते मी राजीनामा दिला होता, मग धनंजय मुंडे का देत नाहीत, असा सवालही यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे.

## पाटांगण गल्लीतील अंगणवाडीत शिवजयंती साजरी



प्रतिनिधी बीड बीड शहरातील पाटांगण गल्ली येथील अंगणवाडी क्रमांक ६१ मध्ये बुधवारी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने अंगणवाडीतील चिमुकल्यांनी छत्रपती शिवाजी महाराज व राष्ट्रमाता जिजाऊ यांची वेशभुषा साकारली होती.अंगणवाडीत बुधवारी सेविका शोभा पाटील व मदतनीस रेखा बीडकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतीमेचे पुजन करून अभिवादन केले. जयंती कार्यक्रमास अंगणवाडीतील १५ मुले उपस्थीत होती.यावेळी अंगणवाडी सेविका शोभा पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन कार्यावर मुलांना माहिती दिली.

## शिवसंग्राम चालक-मालक संघटनेची कार्यकारणी जाहीर; अध्यक्षपदी संदीप भांबे

शिवसंग्राम चालक - मालक संघटनेची कार्यकारणी दि. १८ फेब्रुवारी रोजी शिवसंग्राम भवन येथे शिवसंग्राम अध्यक्ष डॉ ज्योती विनायकराव मेटे यांच्या सूचने नुसार जिल्हाध्यक्ष प्रा. सुभाष जाधव यांनी जाहीर केली. या वेळी अध्यक्षपदी संदीप भांबे तर सचिवपदी विकास गोटे यांची निवड करण्यात आली या प्रसंगी शहराध्यक्ष सुहास पाटील, मनोज जाधव,सुनील शिंदे, शेषेराव तांबे, अशोक लोकरे आदी शिवसंग्रामचे प्रमुख कार्यकर्ते, पदाधिकारी यांच्या सह बीड मधील असंख्य चालक



- मालक उपस्थित होते. शिवसंग्राम भवन येथे आदरणीय डॉ. ज्योती मेटे यांच्या आदेशानुसार शिवसंग्राम चालक-मालक संघटना जिल्हा परिषद पॉइंट यांची बैठक घेऊन कार्यकारणी जाहीर केली. यात संदीप भांबे अध्यक्ष ,रज्जाक पठाण उपाध्यक्ष, राजरतन वडमारे उपाध्यक्ष,विकास गोटे सचिव ,नितीन मुंडे कोषाध्यक्ष,मोहन वाघमारे मार्गदर्शक, जालिंदर पाखरे मार्गदर्शक,अनिल घुमरे मार्गदर्शक, शेषराव तांबे मार्गदर्शक यांच्या निवडी करण्यात आल्या यावेळी चालक-मालक यांना येणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी ही संघटना काम करणार आहे असे प्रतिपादन जिल्हाध्यक्ष प्रा. सुभाष जाधव यांनी केले आणि निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

## मराठा सेवा संघाचे मराठा भूषण पुरस्कार जाहीर!



मराठा सेवा संघ बीड व अंतर्गत सर्व कक्ष यांच्या वतीने दरवर्षी शिवजन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा केला जातो या वर्षीही शिवजन्मोत्सव सोहळा दि. २१/२/२०२५ वार शुक्रवार रोजी ठीक सायं. ७ वा यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड या ठिकाणी संपन्न होत आहे.कार्यक्रम प्रसंगी विविध क्षेत्रात कार्यरत समाजातील तळागाळातील व्यक्तीसाठी योगदान देणाऱ्या समाज रत्नांचा मराठा भूषण पुरस्कार देऊन विशेष गौरव करण्यात येणार आहे. शिवजन्मोत्सव सोहळ्यात मराठा भूषण पुरस्काराने सामाजिक व उद्योग क्षेत्रात अतुलनीय कार्य करणारे रमेश भाऊ पोकळे तर वैद्यकीय क्षेत्रात भरीव कामगिरी करणारे प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. शरद शिंदे यांना मान्यवरांच्या हस्ते मराठा समाजभूषण पुरस्कार देवून गौरव करण्यात येणार आहे. यावेळी प्रसिद्ध विचारवंत ज्ञानेश महाराव यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

## शिवजयंती निमित्त १११ मावळ्यांनी केले रक्तदान
### मराठा क्रांती मोर्चा व कर्मयोगी परिवाराच्या शिबिराला उत्स्फुर्त प्रतिसाद

बीड (प्रतिनिधी): संपूर्ण महाराष्ट्र आणि देशाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव याही वर्षी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला असून मराठा क्रांती मोर्चा व कर्मयोगी परिवाराच्या वतीने १९ फेब्रुवारी २०२५ रोजी बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक सोळंके पंप परिसर या ठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी १११ मावळ्यांनी रक्तदान करून छत्रपती शिवाजी महाराजांना मानाचा मुजरा केला.




दरवर्षी कर्मयोगी परिवाराच्या वतीने बीडमध्ये विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. दरवर्षी शेकडो शिवभक्त रक्तदान शिबिरामध्ये सहभागी होतात. दरम्यान शिवजयंती निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराज चौकातील सोळंके पंपावर मोठ्या उत्साहात रक्तदान शिबीर पार पडले. यामध्ये सकाळी ९ वाजेपासून मावळ्यांनी उत्स्फुर्तपणे रक्तदान केले. यावेळी तब्बल १११ जणांनी रक्तदान करून चांगला उपक्रम राबविला. सदरील शिबीर पार पाडण्यासाठी कर्मयोगी परिवाराचे सुदर्शन धांडे, सोमनाथ धांडे, नितीन धांडे, नवनाथ प्रभाळे , पृथ्वीराज धांडे, विशाल धांडे, मयुर मस्के, प्रा.देवेंद्र नेवाळे, आनंद काटकर, मळीराम यादव, सुशील वरोडे, जयनाथ धांडे, राजु संगेवार, राज बडे, देविसिंह शिंदे, जगदीश उबाळे, जयदत्त थोटे, संजय गोडसे युवराज मस्के, बापु जाधव आदींनी परिश्रम घेतले.

## शिवजन्मोत्सवनिमित्त लिंबागणेश येथे शिवरायांच्या शुर शिलेदारांना छायाचित्रांसह फलकाद्वारे मानवंदना



लिंबागणेश:- ( दि.१९ ) बीड तालुक्यातील छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती लिंबागणेश यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त शुर शिलेदारांना मानवंदना देत इतिहासाच्या पानांवरती माहिती दुर्मिळ असलेल्या कर्तृत्ववान शुरवीर मावळ्यांची व शिलेदारांचा जाज्वल्य इतिहास यावर्षी शिवतीर्थ याठिकाणी फलकाद्वारे लावण्यात आला आहे.या आदर्श उपक्रमामुळे दुर्मिळ ईतिहासाची माहिती छायाचित्रांसह सर्व सामान्य माणसांपर्यंत पोहोचत आहे. शिवरायांच्या शुरवीर मावळ्यांमध्ये नरवीर सुभेदार तानाजी मालुसरे, वीरबाजी पासलकर, सरनौबत येसाजी कंक,शिवरत्न जिवाजी महाले, गुप्तहेर बहिर्जी नाईक शिव रक्षक संभाजी कावजी स्वराज्याचे पहिले सेनापती बाजी पासलकर वीर योद्धा शेलार मामा निष्ठावंत मावळा सिद्धी हिलाल,अशा शुरवीर शौर्य गाजवलेल्या मावळ्यांची छायाचित्रासह माहिती फलकाद्वारे देण्यात आली आहे.




## जयंतीदिनी केजमध्ये उभारला छत्रपती राजेंचा अश्वारुढ पुतळा
### केज शहरात शिवप्रेमींकडून आनंद साजरा

केज । शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात जयंतीदिनी जाणता राजा यांचा अश्वारुढ पुतळा रातोरात उभारला असून, सकाळी तो दिमाखात उभा दिसल्याने शिवप्रेमींचा आनंद गगनात मावेनासा झाला असून, शहरात आनंदोत्सव साजरा करण्यात येत आहे. आज भारतभर छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहाने साजरा केली जाते. केज येथेही मोठ्या उत्साहाने शिव जन्मोत्सव साजरा केला जातो. शहरातील तहसील कार्यालय जवळ मुख्य रस्त्यावर छत्रपती शिवाजी महाराज चौक पुर्वीपासून स्थापना केली आहे . मात्र महाराजांचा पुतळा बसवण्यात यावा अशी मागणी समस्त शिव भक्त करत होते. परंतू काही शासकीय बाबींची अडचण येत होती. हा पुतळा बसविण्यासाठी प्रयत्न करण्यात आला. पण याला तत्कालीन प्रशासकीय अधिकाऱ्यांनी विरोध केल्याने तो प्रयत्न फसला होता. पण येथे राजेंचा पुतळा असावा हा समस्त शिवप्रेमींचं स्वप्न होतं. आज छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या दिवशीच महाराजांचा अश्वारूढ पुतळा रातोरात उभा राहिला आणि सकाळी शिव भक्तांना पाहावयास मिळाला आहे. त्यामुळे सर्वत्रच आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. शिवभक्तांनी हा अश्वारूढ पुतळा पाहण्यासाठी एकच गर्दी केली आहे. तर केज शहराच्या यामुळे भर पडली असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे

## संपादकीय

# गडकिल्ले भारताचे शिव वैभव

छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती हा एक महाराष्ट्राचा उत्सवाचा सन असुन देशासाठी गौरवाचा आणि महत्वपूर्ण दिवस आहे. त्याचप्रमाणे जगासाठी गनीमीकव्याची शिकवन असुन जगात आपण जो गोरीला वॉर म्हणतो त्याची उत्पत्ती गनीमीकव्यातुनच झाली आहे.म्हणुनच जगात शिवाजी महाराजांच्या इतिहासाला आगळेवेगळे महत्त्व आहे. १९ फेब्रुवारीला संपूर्ण महाराष्ट्रभर शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते.सन १८६९ साली महात्मा जोतिबा फुले यांनी रायगडावरील शिवाजी महाराजांची समाधी शोधून काढली व त्यांच्या जीवनावर सर्वप्रथम पोवाडा लिहिला. शिवाजी महाराजांचे कार्य लोकांपर्यंत पोहोचावे यासाठी फुलेंनी सन १८७० साली शिवजयंतीची सुरूवात केली.ती पहीली शिवजयंती होती.त्यानंतर शिवजयंतीच्या माध्यमातून लोकांना एकत्र करण्याचे काम लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी केले. २० व्या शतकात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देखील शिवजयंती साजरी केली व दोन वेळा शिवजयंतीच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या थाटात शिवजयंतीला सुरूवात झाली.महाराष्ट्र सरकारने २००१ पासून शके १५५१ (शुक्रवार १९फेब्रुवारी १६३०) ही शिवजयंतीची तारीख स्वीकारली त्यानुसार महाराष्ट्र सरकारने १९ फेब्रुवारी सार्वजनिक सुट्टी जाहिर केली.इतर संभाव्य तारखांमध्ये ६ एप्रिल १६२७ (वैशाख शुद्ध तृतीया) ही जन्म तारीख मानली जाते. त्यानुसार महाराष्ट्राबाहेर अनेक लोक शिवजयंतीचा दिवस म्हणून वैशाख शुद्ध तृतीया हा दिवस मानतात. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या दिनदर्शिकामध्ये शिवजयंतीची वेगवेगळी तारीख दाखवीली आहे. महाराष्ट्रात शिवजयंतीच्या तारखेला महत्व नसुन त्यांचे कर्तुत्व,त्यांचा त्याग,रयतेची जबाबदारी आणि लाखोंनी सैन्य घेऊन चढाई करणाऱ्या मोगल साम्राज्याचा अंत करणे हे महत्वाचे आहे.मी तर म्हणेल की शिवजयंती रोज साजरी व्हावी आणि शिवाजी महाराजांचे गोडवे जनतेपर्यंत पोहचवावे. तेव्हाच भारतात एकच नाही तर लाख शिवा तयार होतील. कारण शिवाजी महाराजांच्या पुण्यांयीनेच आज आपण ताठ मानाने आणि स्वाभिमानाने जगत आहो. गनीमीकाव्याने मोगलायीचा व मोगल साम्राज्याचा अंत केला व हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. याचा गर्व महाराष्ट्रासह संपूर्ण भारताला आहे. आज भारताची गौरव गाथा जी आपण ऐकतो त्याचे संपूर्ण श्रेय शिवरायांनाच आहे.शिवाजी महाराज म्हणजे महाराष्ट्रासह संपूर्ण भारताची अबाध्य शक्ती आहे. शिवजयंतीच्या निमित्ताने शिवाजी महाराजांचे विचार समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहचले पाहिजे.जानता राजा, रयतेचा राजा,हिंदवी स्वराज्याचे संस्थापक म्हणून जगभर ख्याती प्राप्त आहे.त्यामुळे केवळ महाराष्ट्रातच किंवा भारतातच नव्हे तर संपूर्ण जगभरात शिवाजी महाराजांचे नाव आदराने आणि स्वाभिमानाने घेतले जाते.तत्वज्ञ, इतिहासकार शिवाजी महाराजांवर अभ्यास करण्यासाठी भारतात येतात. १९ फेब्रुवारी रोजी सुमारे १११ पेक्षा अधिक देशांमध्ये शिवाजी महाराजांची जयंती साजरी केली जाते.असे सांगण्यात येते की शिवाजी महाराजांकडे अनेक जातीवंत घोडे सुध्दा होते. कोणत्या घोड्यांचा वापर केव्हा करायचा हे त्यांना चांगलेच अवगत होते.शिवाजी महाराजांकडे मोती, विश्र्वास,तुरंगी, इंद्रायणी,गाजर,रणभीर,कृष्णा असे ७ घोडे होते. शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करतांना सुमारे ४०० गड आपल्या अधिपत्याखाली आणले होते. काही गड त्यांनी स्वतः बांधले तर काही किल्ले लढाया करून जिंकले. महाराजांचा एक गडकिल्ला म्हणजे स्थापत्यशास्त्र, व्यवस्थापन आणि गनिमी काव्याचे प्रतिकच होते. त्यामुळे मी केंद्र व राज्य सरकारला आग्रहाची विनंती करतो करतो की महाराष्ट्रातील संपूर्ण गडकिल्ल्यांची देखरेख करून सुसज्जीत केले पाहिजे. यातच शिवरायांना खरा मानाचा मुजरा ठरेल. कारण महाराष्ट्रासह संपूर्ण भारतातील गडकिल्ले ही भारताचे वैभव,धरोहर व शान आहे. कारण गडकिल्ल्यामुळेच शिवरायांच्या आठवणी पुन्हापुन्हा जागृत होतील.गडकिल्यांची सुरक्षा म्हणजे शिवजयंतीच्या निमित्ताने महाराजांना खरे अभिवादन व मानवंदना ठरेल. कारण शिवरायांनी मुठभर मावळ्यांच्या साक्षीने हिंदवी स्वराज्याची स्थापना केली व संपूर्ण किल्ले काबीज केले हा अभिमान महाराष्ट्रासह संपूर्ण भारताला आहे.त्यामुळे इतिहास जागृत ठेवण्यासाठी संपूर्ण किल्ले पर्यटनाच्या दृष्टीने व शिवरायांची आठवण या उद्देशाने किल्ल्यांचे जतन करणे गरजेचे आहे. कारण शिवाजी महाराज रयतेचे राजा होतेच.त्याचप्रमाणे त्यांच्यात दैवी शक्ती सुध्दा होती. ३९५ वर्षांनंतर आजही कुठल्याही गडकिल्ल्यांवर गेले तर ४ हजार फूट उंचीवर भर उन्हाळ्यात आपल्याला किल्ल्यावर स्वच्छ पाणी प्यायला मिळते.हा संपूर्ण शिवरायांचाच प्रताप आहे.असे सांगण्यात येते की वयाच्या १७ व्या वर्षी शिवरायांनी स्वतः डिझाईन करून रायगड किल्ला बांधल्याचे सांगण्यात येते. आई जगदंबेच्या आशीर्वादाने शिवाजी महाराजांनी आपले संपूर्ण काम फत्ते केले व मावळ्यांमध्ये उर्जा निर्माण करून मोगलांना भुईसपाट केले.अबझल खानासारख्या महाकाय शक्तीशाली सरदाराला गनीमीकाव्याने यमलोक पोहचवीले. अशाप्रकारे मोगलांच्या संपूर्ण सरदारांना एक-एक करून धाराशाही करण्याचे काम शिवरायांनी व त्यांच्या सरदारांनी आणि मावळ्यांनी केले. हा देश साधुसंतांचा,थोरमहात्म्यांचा, क्रांतीकारकांचा व हिंदवी स्वराज्याची स्थापना करणाऱ्या शिवरायांचा देश आहे.याची जोपासना महाराष्ट्र व केंद्र सरकारने करावी अशी मी आग्रहाची विनंती करतो.महाराष्ट्रातील १२ गडकिल्ले युनेस्कोकडे नामांकनासाठी पाठविले आहे ही महाराष्ट्रासाठी व भारतासाठी आनंदाची अभिमानाची गोष्ट आहे.

# बदलती माध्यमं आणि बदलणारी भाषा

भाषा ही माणसाला मिळालेली सर्वात मोठी देणगी होय. भाषा ही संस्कृतीची वाहक आहे.भाषेशिवाय मानवी अस्तित्व आणि मानवी संस्कृती यांची कल्पनाही करणे अशक्य. मानवी जीवनातील आणि अर्थातच मानवी संस्कृतीतील संचित भाषेच्या माध्यमातूनच एका पिढीतून दुसऱ्या पिढीत संक्रमित झाले आहे. भाषा कुठून येते ? आपण ङ्ग मातृभाषाफ असा शब्दप्रयोग करतो तेव्हा आईची जी भाषा ती मुलाची भाषा असा अर्थ आपल्याला अभिप्रेत असतो काय ? लहान मुल त्याच्या परिसरातील भाषा आत्मसात करते.ते वाढत जाते , तसा त्याच्या परिसराचा विस्तार होतो आणि त्याचा त्याच्या भाषेवर परिणाम होतो. आमच्या छत्रपती संभाजीनगरला (औरंगाबाद) राहणारे लोकं घराबाहेर पडले की अगदी सहज हिंदी बोलतात. आपण ज्या विक्रेत्याकडून भाजी घेत आहोत , तो ग्रामीण भागातून आलेला आपल्यासारखाच मराठी माणूस आहे, याचा जणू विसरच पडतो आणि म मेथी क्या भाव है ? म असा प्रश्न हाती भाजीची जुडी घेत सहजपणे विचारतो! प्रश्न भाषेचा असल्याने आणि भाषा ही मूलतः वैयक्तिक असल्याने काही व्यक्तिगत अनुभव नमूद करायला हवेत.साधारण पस्तीस वर्षांपूर्वी पुण्यात राहणाऱ्या मित्राने मला बजावले होते की , पुण्यात रिक्षावाल्याशी हिंदीत बोलायचे नाही ! हिंदीत बोलणारा माणूस पुण्यातील नाही म्हणजे नवखा आहे , असे रिक्षावाल्यांच्या लगेच लक्षात येते आणि मग त्यातील एखादा जवळच्या अंतरासाठी दूरचा रस्ता जवळ करू शकतो असे त्या मित्राचे सांगणे होते.दुसरा अनुभव दिल्लीतील.तेथे राहणारे माझे एक आप्त मला म्हणाले की त्यांच्या परिचयाच्या अन्य मराठी माणसांच्या तुलनेत माझी हिंदी चांगली आहे. या आप्तांना चांगल्या वाटलेल्या माझ्या हिंदीचे कारण माझे छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील वास्तव्य म्हणजे माझा परिसर हे आहे. वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धांसाठी मार्गदर्शन करणारे प्रा. वसंतराव कुंभोजकर विद्यार्थ्यांना सांगत की , मराठी शब्दोच्चारांवर लक्ष द्यायला हवे. हिंदीत ङ्गण म नाही पण मराठीत तो आहे आणि त्याचा उच्चार म न म पेक्षा वेगळा आहे ! ही सगळी उदाहरणे भाषेचे परिसराशी असलेले नाते सांगणारी आहेत. कोणतेही व्याकरण शिकण्यापूर्वी भाषा आत्मसात करण्याची मानवी क्षमता नैसर्गिक असल्याचे भाषाशास्त्रज्ञ सांगतात. परिसरात माणसं असतात तशी माध्यमं असतात. आज तर माध्यमांचे प्रकार आणि त्यांची संख्या वाढती आहे.ही सारी माध्यमं आपल्या समोर आणून ठेवणारा मोबाईल आपल्या तर नेहमीच हाती असतो. त्याने आपला जणू सारा परिसरच व्यापला आहे. यातील बराच भाग आभासी असतो आणि तो खऱ्याखुऱ्या परिसरापासून आपल्याला नेहमी दूर नेतो , हेही लक्षात घ्यावे लागते. आपला परिसर माध्यमांनी व्यापलेला असल्याने माध्यमांच्या भाषेचा विचार करावा लागतो. कोणे एकेकाळी (हा कोणे एकेकाळ फार लांबचा नाही !) माध्यमांचे विश्व म्हणजे दैनिके , नियतकालिके , आकाशवाणी आणि दूरदर्शन असे होते. (आकाशवाणी आणि दूरदर्शन हे शब्द रेडिओ आणि टेलिव्हिजन या शब्दांचे मराठी प्रतिशब्द नव्हेत.पण माध्यमांनी त्या अर्थाने ते रूढ केले आहेत. म झेरॉक्स म हा शब्दही असाच रूढ झाला आहे. मागच्या पिढीत वनस्पती तुपासाठी म डालडा म हा शब्दही असाच रुढ झाला होता.) जेव्हा माध्यमाचे विश्व मर्यादित होते , तेव्हा त्यांच्यातील स्पर्धाही मर्यादित होती. (माणसाची झोप ही आमची प्रतिस्पर्धी आहे , असे म्हणणाऱ्या म नेटफ्लिक्स म चा काळ तेव्हा कल्पनेतही नव्हता !) एकूण जीवनाला आजच्या सारखी गती नव्हती. म सर्वात आधी आणि सर्वांच्या पुढे म हा आजचा जीवनमंत्र तेव्हा माध्यमांनी स्वीकारलेला नव्हता. तेव्हा तंत्रज्ञान आजच्या इतके गतीमान नव्हते आणि त्याच्या गतीची मर्यादा स्वीकारली गेली होती.माध्यमे तंत्रज्ञानप्रधान नव्हती.तेथे काम करणारे आणि वाचक (ग्राहक नव्हे !) महत्वाचे होते.वाचकांची जडणघडण आपण करू शकतो , ही भूमिका तेव्हा रूढ होती म्हणूनच काही दैनिके राशिभविष्य छापत नव्हती. काही दैनिके आसाम ऐवेजी असम , पंतप्रधान ऐवेजी प्रधानमंत्री , मध्यपूर्व ऐवेजी पश्चिम आशिया , उत्तरपूर्व ऐवेजी इशान्य असे शब्द जाणीवपूर्वक उपयोगात आणत.त्या काळातील भाषा ही बहुतेकवेळा प्रमाणभाषेशी नाते सांगणारी होती. मराठी शब्द कटाक्षाने वापरण्याकडे कल होता.आज एका बाजूला कम्प्युटर हा शब्द वापरला जातो आणि त्याच वेळी डेटा या शब्दासाठी विदा हा शब्द रूढ करण्याचा प्रयत्न सुरू असतो आणि यात विसंगती आहे , असे कोणालाही वाटत नाही. हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्ट यांना अनुक्रमे उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालय हे रूढ झालेले शब्दही वापरले जात नाहीत. काही वेळा मुख्य न्यायाधीश आणि सरन्यायाधीश असा फरक केला जात नाही. दिनांक ऐवजी तारिख , सप्ताह ऐवेजी आठवडा असे सोपे शब्द रुजवण्यासाठी प्रयत्न झाले , याचा आता विसर पडला आहे. हे घडत आहे याची अनेक कारणे आहेत. वर्तमानपत्रांच्या जगात पूर्वी बातमी असो की लेख , ते संपादकीय संस्कार केल्यानंतरच पुढे पाठवले जात. वार्ताहर , मुख्य वार्ताहर ,उपसंपादक , मुख्य उपसंपादक , वृत्तसंपादक... अशा पायऱ्या तेव्हा केवळ नामाभिधानासाठी अस्तित्वात नव्हत्या तर त्यांची स्वतंत्र कार्ये निर्धारित होती.आज ही पदं अस्तित्वात आहेत पण त्यांची दैनंदिन कार्ये बदलेली दिसतात. हा बदल तंत्रज्ञानातील बदलासोबत आला.तंत्रज्ञान गती आणि स्पर्धा घेऊन आले. त्याने माध्यमांचे स्वरूप बदलले. मुद्रितशोधक हद्दपार झाला. बातमीदार असो की लेखक , तोच त्याच्या मजकूराचा अनेकदा उपसंपादक ठरू लागला. जी दैनिके वेगळी जिल्हा पाने देतात , त्या पानांत या स्थितीचे प्रतिबिंब सहज दिसते.याचा परिणाम भाषेवर झाला. काहींनी नव्या पिढीशी नाते जोडायचे म्हणून त्या पिढीच्या भाषेशी नाते जोडण्याचा व्यावहारिक आग्रह धरला.त्याला कधी तात्विक रूप दिले. त्यातून भाषेचे रूप आणखी पालटले. महानगरातील भाषेत जशी इंग्रजी आणि हिंदीची सरमिसळ झालेली असते तशीच भाषा दैनिकातून डोकावू लागली. महानगरात राहणारी नवी पिढी इंग्रजी माध्यमातून शिकते.त्याच पिढीतील प्रतिनिधी आज वेगवेगळ्या माध्यमातून काम करतात.मग वटहुकूम आणि शासन निर्णय , विधेयक आणि कायदा यात फरक केला जात नाही. मराठीत क्रियापदांचे अनेकवचनी रूप असते , आदरार्थी अनेकवचन उपयोगात आणण्याची पद्धत आहे अशा बाबींचा विसर पडतो. कोणतीही भाषा स्थिर असू शकत नाही आणि भाषेने अन्य भाषांमधील शब्द स्वीकारण्यास काही प्रतिबंध असू शकत नाही.पण असे शब्द स्वीकारताना आपल्या मूळ भाषेला रजा देण्याची गरज नाही.बँकेला बँक म्हणावे पण चेक साठी धनादेश हा शब्द सर्वांना समजतो ना ? आपल्या भाषेविषयी मराठी माणूस जागरूक नाही , ही विदारक वस्तुस्थिती आहे. मागे नगरला (आजचे अहिल्यानगर) साहित्य संमेलन झाले तेव्हा सुप्रसिद्ध दिग्दर्शक बासू भट्टाचार्य म्हणाले होते की, कलकत्ता शहरात सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ राहायचे असेल तर बंगाली भाषा शिकावीच लागते.पण महाराष्ट्रात तशी परिस्थिती नाही.येथे पिढ्यानपिढ्या राहणारी माणसं मराठी नव्हे तर त्यांची मातृभाषा आणि हिंदी / इंग्रजी बोलत राहू शकतात.राहतात. असे म्हणतात की ही विदारक वस्तुस्थिती ते सांगत होते तेव्हा सभामंडपातील प्रेक्षक टाळ्या वाजवत होते. आपल्याकडील माध्यमात याच अवस्थेचे प्रतिबिंब पडले आहे. त्यामुळे अनेकदा माध्यमातून कानी पडणारी किंवा वाचनात येणारी मराठी ही अनेकदा मराठी वळणाची राहिलेली दिसत नाही. त्यातून मग म धन्यवाद म मानतो म / म मानते म यासारखे शब्दप्रयोग रूढ होतात. आभार मानले जातात आणि धन्यवाद दिले जातात हे लक्षात घेतले जात



राधाकृष्ण मुळी
निवृत्त संचालक
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

नाही. आपल्याकडे दूरचित्रवाणीचा झपाट्याने विस्तार होत असताना एका मान्यवरांनी असे लिहिले होते की , पाश्चात्य देशात म मुद्रण संस्कृती म रुजल्यानंतर तेथे टेलिव्हिजन आला. आपल्याकडे मुद्रण संस्कृती रुजण्यापूर्वीच टेलिव्हिजन आला आणि विस्तारत असून त्याचे काही दुष्परिणाम संभवतात.भाषेच्या बाबतीत हे दुष्परिणाम आपण आता अनुभवत आहोत. मुद्रीत माध्यम हे शब्दप्रधान आहे. नभोवाणीचे माध्यम शब्दच आहे. टेलिव्हिजनचे माध्यम कॅमेरा आहे. लिहिले जाणारे शब्द आणि टिपले जाणारे दृश्य यात अंतर असणार हे उघड असले तरी ते माध्यमांचा परस्परांवर परिणाम होऊ नये म्हणून आवर्जून लक्षात घेणे फार आवश्यक आहे. क्रिकेटच्या सामन्याचे दूरचित्रवाणीवरून होणारे थेट प्रक्षेपण , नभोवाणीवरून त्याच सामन्याचे प्रसारित होणारे धावते वर्णन आणि त्याच सामन्याचा दुसऱ्या दिवशी प्रसारित होणारा वृत्तांत यात फरक असणे स्वाभाविक आहे.असाच फरक या तीन माध्यमातून येणाऱ्या अन्य बाबींबद्दल असायला हवा. बोलण्याची भाषा आणि लिहिण्याची भाषा यात असणाऱ्या फरकाची जाणीव ठेवणे ही प्राथमिक गरज आहे. आपल्याकडे जेव्हा एखाद्या महत्वाच्या घडामोडीचे तपशील दूरचित्रवाणी वाहिन्यांवर दाखवले जातात तेव्हा कॅमेरा त्याचे दृश्य टिपण्याचे काम त्याच्या यांत्रिक क्षमतेने आणि वेगाने करीत आहे , मानवी तोंडातून निघणारे शब्द त्याच्याशी स्पर्धा करू शकत नाहीत याचा निवेदकांना / बातमीदारांना विसर पडलेला दिसतो. वर्तमानपत्रातही हे घडत असल्याचे हल्ली अनुभवास येते.तपशिलाच्या पसाऱ्यात नेमकेपणा हरवून जातो.हा माध्यमांचा परस्परांवर होत असलेला परिणाम आहे.असाच परिणाम मांडणीतही होत असल्याचे अनुभवास येते. छोट्या पडद्यावर एकाच वेळी निवेदक / वार्ताहर दिसतो , त्यांचा ज्यांच्याशी संवाद सुरू असतो तेही दिसतात , जे काही दाखवले जात आहे , त्याच्याशी निगडीत शब्दांकन दिसत असते , म स्क्रोल म सुरू असतो , कोपऱ्यात तपमान वगैरे दिसत असते.हे सारे रंगीत असते. वर्तमानपत्रातही मांडणीत अनेकदा अशी गर्दी दिसते.तेथे पुरेसे अंतर राखणारी कोरी जागा अर्थपूर्ण ठरते याचा विसर पडत चाललेला आहे. आपल्याकडे वाहिन्या बहुभाषक असणे अपरिहार्य आहे.त्याचेही भाषेवर दुष्परिणाम होत आहेत. हिंदीत म खुलासा म हा शब्द ज्या अर्थाने वापरला जातो , त्या अर्थाने तो मराठीत उपयोगात आणला जात नाही. पण हल्ली हा म खुलासा म मराठीत ऐकू येत असला तरी तो हिंदीतील आहे , हे लक्षात घ्यावे लागते ! अशी किती तरी उदाहरणे देता येतील. हल्ली लहान मुलं त्यांच्या संभाषणात खूप हिंदी शब्द वापरत असतात.त्याचा उगम ते पाहतात त्या म कार्टुन शो म मध्ये आहे. आपल्याकडील लग्नसमारंभातील मराठीपण जसे हळूहळू हरवत आहे , तसेच भाषेचेही होत आहे ! कौटुंबिक नात्यातील मराठी संबोधने बाजूला पडत असून भाऊजी या शब्दाची जागा जिजाजी , मेहुणा या शब्दाची जागा साला या शब्दांनी घेतली आहे. एकेकाळी वर्तमानपत्रांनी परिभाषेत भर घातली.आता व्यवहारात रूढ झालेले मराठी शब्द बाजूला सारून तेथे इंग्रजी / हिंदी शब्दांचा उपयोग सुरू आहे , याचा पदोपदी अनुभव येतो. एकीकडे माध्यमातील नवी पिढी कार्यक्षम आणि तंत्रस्नेही असल्याचा अनुभव येत असतानाच त्यांचा मराठी शब्दसंग्रह मर्यादित होत असल्याचे जाणवते.याचे कारण या पिढीत मराठी साहित्याचे वाचन कमी झाले आहे , हे असावे. इंग्रजी माध्यमातून होणारे शिक्षण , बहुभाषक परिसरात संपर्कासाठी सहजपणे उपयोगात आणली जाणारी हिंदी , माध्यमांना आलेले तंत्रज्ञानप्रधान व्यवसायाचे रूप , उसंत न देणारी वाढती स्पर्धा या आणि अशा काही कारणांमुळे आजच्या माध्यमात दिसणारी भाषा विचित्र रूप धारण करीत आहे. माध्यमांचा समाजमनावर होणारा परिणाम लक्षात घेता माध्यमांकडून उपयोगात आणली जाणारी भाषा महत्वाची ठरते. ती निष्कारण कठीण , बोजड नको तशीच स्वतःचे अस्तित्व सहजपणे विसरणारीही नको. ती पुढे जाणारी , स्वागतशील हवी आणि तिचे नाते तिच्या मुळांशी हव

# मधुकर महाराज खाडे यांचे वारकरी संप्रदायातील योगदान अविस्मरणीय

केज । प्रतिनिधी मधुकर महाराज खाडे हे भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे आधारस्तंभ होते. त्यांचे वारकरी संप्रदायातील योगदान अविस्मरणीय आहे, असे प्रतिपादन होळ येथील संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प.डॉ. प्रल्हाद महाराज ढाकणे शास्त्री यांनी व्यक्त केले. वै.पै.मधुकर महाराज खाडे यांचे दि.६ फेब्रुवारी रोजी अपघाती निधन झाले. केज तालुक्यातील होळ येथील श्री संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे संस्थापक ह.भ.प.अर्जुन महाराज लाड यांच्या मार्गदर्शनाखाली गंगापुजनानिमित्त भगवान बाबा मंदिरात दि.१३ ते १९ फेब्रुवारी दरम्यान किर्तन सप्ताह होत आहे. ह.भ.प.डॉ. प्रल्हाद महाराज ढाकणे शास्त्री हे मंगळवारी (दि.१८) किर्तन सेवेप्रसंगी बोलत होते. डॉ. प्रल्हाद महाराज ढाकणे शास्त्री यांनी संत तुकाराम महाराज यांचा अनुसरे तो अमर झाला । अंतरला संसारा ।।१।। न देखती गर्भवास । कधीं दास विष्णूचे ।।ध्रु.।। विसंभेना माता बाळा । तैसा लळा पाळावा ।।२।। त्रिभुवनीं ज्याची सत्ता । तो रक्षीता जालिया ।।३।। हा अभंग किर्तन सेवेसाठी घेतला होता. ढाकणे महाराज म्हणाले, भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे आधारस्तंभ मधुकर महाराज खाडे यांच्या निधनाने पंचक्रोशीची हानी झाली आहे. त्यांनी वारकरी संप्रदायावर नितांत प्रेम केले. संत जोग महाराज पैलवान होते. त्यांनी वारकरी शिक्षण संस्था स्थापन केली. अगदी त्यांचा आदर्श समोर ठेऊन मधुकर खाडे महाराज यांनी होळ येथे वारकरी शिक्षण संस्था सुरू केली. त्यांच्यामुळे किर्तनकार, वारकरी मंडळी होळ परिसराला सहज उपलब्ध होतात. ही खाडे महाराज यांची कृपा आहे. पैलवान मंडळी कधी झुकत नाहीत. अगदी शेवटपर्यंत त्यांनी हा बाणा जपला. तसेच, अर्जुन महाराज लाड यांच्याप्रती असलेली श्रध्दा, निष्ठा कायम ठेवली. त्यांचा आणि काम, क्रोधाचा दुरान्वये संबंध नव्हता, म्हणून ते लोकप्रिय व्यक्तीमत्व बनले, असे मत ढाकणे महाराज यांनी व्यक्त केले. यावेळी होळचे ग्रामस्थ, संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, आजी-माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवरायांच्या स्वराज्यात समानता होती - ज्ञानेश महाराव

## शेळगावकर,आगळे, देवसरकर , पाटील,शिरफुले यांना पुरस्कार

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

किनवट : मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड व इतर कक्ष आयोजित सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती नवा मोंढा नांदेड येथे छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सवानिमीत्त कार्यक्रम घेण्यात आला यावेळी प्रमुख वक्ते ज्ञानेश महाराव यांचे व्याख्यान झाले यात ज्ञानेश महाराव यांनी शिवरायांच्या राज्यात सर्व जातीधर्माचे लोक एकोप्याने आणि आनंदाने राहत होते व त्यांचा महाराजांवर पूर्ण विश्वास होता.शिवरायांच्या काळातील लढाया या सत्तेसाठी होत्या धार्मिक नव्हत्या कारण छत्रपती शिवाजी महाराज हिंदू-मुस्लिम असा भेद करत नव्हते स्वराज्यात समानता होती प्रतिपादन ख्यातनाम विचारवंत ज्ञानेश महाराव यांनी केले.दिवाळीपेक्षाही म ोठ्या प्रमाणात शिवजन्मोत्सव साजरा होत आहे आजच्याही बांधकाम अभियंत्यालाही लाजवेल असे किल्ले शिवाजी महाराजांनी त्या काळात बांधले.महायुतीतील सर्व पक्षांनी मिळुन आम्ही मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी जरुर लावु असे मत अध्यक्षस्थानी उपस्थित असलेले महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री खा.अशोक चव्हाण यांनी मांडले. कार्यक्रमाचे उद्घाटन आ.प्रताप पाटील चिखलीकर यांचे हस्ते झाले.प.रताप पाटील चिखलीकर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरा पगड जातीला सोबत घेऊन कार्य केले त्याचप्रमाणे मराठा सेवा सर्व समाजाला सोबत घेऊन कार्य करत आहे नांदेड मधील मराठा सेवा संघाचे कार्य कौतुकास्पद आहे असे ते म्हणाले.





छावा चित्रपट टॅक्स फ्री करावा मराठा सेवा संघाचे कार्य वाखाणण्याजोगी आहे असे मत खा.रविंद्र चव्हाण यांनी मांडले.शिवरायांचा ईतिहास तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी मराठा सेवा संघाचे काम कौतुकास्पद आहे असे मत आ.बालाजी कल्याणकर यानी मांडले.म ान्यवरांच्या हस्ते मराठा भुषण पुरस्कार माधवराव शेळगावकर यांना देण्यात आला. जिजाऊ रत्न पुरस्कार गिरजाबाई आगळे यांना देण्यात आला,पहिल्या महिला डॉक्टर यांच्या नावे देण्यात येणारा डॉ रखमाबाई सावे पुरस्कार डॉ शुभांगी अंकुश देवसरकर यांना देण्यात आला,कृषी क्षेत्रातील मराठा सेवा संघ कृषी भुषण पुरस्कार बळीराम पाटील कामळजकर यांना तर खाशाबा जाधव यांच्या नावाने देण्यात येणारा क्रिडा क्षेत्रातील पुरस्कार शिवतेज बालाजी शिरफुले यांना देण्यात आला,मॅरेथॉन स्पर्धेत मुलांमध्ये प्रणव राठोड प्रथम,निवृत्ती गुडेवाड द्वितीय,सुजीत राठोड तृतीय तर मुलींमध्ये शिवानी बोकारे प्रथम, पुजा अरकुंडे द्वितीय,राणी राठोड तृतीय आली आहे.विजेत्या स्पर्धकांना प्रथम सात हजार, द्वितीय पाच हजार तृतीय दोन हजार रूपये बक्षीस वक्तृत्व, निबंध, रांगोळी, चित्रकला, घरगुती शिवजयंती सजावट स्पर्धा या स्पर्धेतील विजेत्यांना रोख रक्कम व प्रशस्तीपत्र देण्यात आले.खा.रविद्र चव्हण,आ.बालाजी कल्याणकर,आ.आनंदराव बोंढारकर,माजी आ.मोहन हंबर्डे, जिल्हा परिषदेच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी रेखा काळम,माजी महापौर जयश्री पावडे, डॉ रेखा पाटील,फरिदा बकश,माजी उपमहापौर सतीश देशमुख,आनंद चव्हाण,माजी नगरसेविका डॉ करुणा जमदाडे,इंजि.तानाजी हुस्सेकर,एकनाथ मोरे, गोविंद नागेलीकर, विठ्ठल पावडे,माधव देवसरकर, तिरुपती कौठेकर,माधव पावडे, अविनाश कदम,छावाचे जिल्हाध्यक्ष दशरथ कपाटे,मराठा सेवा संघाचे प्रदेश सहसचिव डॉ पंजाबराव चव्हाण,मधुकर देशमुख,इंजि शे रा पाटील,इंजि.सुदेश देशमुख,इंजि व्ही. टी. शिंदे, सोपान क्षिरसागर, माणिकराव हेंद्रे,पंडीत कदम, संतोष देवराये,मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष उद्धव सुर्यवंशी, मराठा सेवा संघ जिल्हाध्यक्ष नानाराव कल्याणकर,संभाजी ब्रिगेड विभागीय अध्यक्ष संकेत पाटील,आदींची उपस्थिती होती.

शिवजन्मोत्सव साजरा करण्यासाठी ज्यांनी ज्यांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहकार्य केले त्यांचे आम्ही ऋणी आहोत असे मत आपल्या प्रास्ताविक शिवजन्मोत्सव समिती चे अध्यक्ष ॲड..बालाजी वाघमारे यांनी व्यक्त केले.आलेल्या सर्व मान्यवरांचे तसेच समाज बांधवाचे स्वागताध्यक्ष या नात्याने स्वागत करतो तसेच मराठा समाजाचा ओबिसीत समावेश झाला तरच आरक्षण टिकु शकते असे मत शिवजन्मोत्सव समिती चे स्वागताध्यक्ष तथा मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष पंडीत कदम यांनी मत व्यक्त केले.संचलन मुरलीधर हंबर्डे यांनी केली प्रारंभी छ.शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊ चे पुजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. जिजाऊ वंदना घेण्यात आली.मिरवणुकीतील ढोल ताशा व बँड पथक,महिला रैली तसेच जय जिजाऊ-जय शिवरायच्या गजराने परिसर दणाणून गेला होता.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिवजन्मोत्सव समिती अध्यक्ष ॲड. बालाजी वाघमारे मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष तथा शिवजन्मोत्सव समिती स्वागताध्यक्ष पंडित कदम म राठा सेवा संघ जिल्हाध्यक्ष सतीश जाधव,नानाराव कल्याणकर,उद्धव सुर्यवंशी, संभाजी ब्रिगेड विभागीय अध्यक्ष संकेत पाटील, संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष सुभाष कोल्हे, परमेश्वर पाटील,प्रसिद्धी प्रमुख बालाजी सिरसाट जिजाऊ ब्रिगेड जिल्हाध्यक्ष सुमित्रा वडजकर, जिल्हाध्यक्ष कल्पना चव्हाण, डॉ विद्या पाटील,अरुणा जाधव,वनिता देवसरकर,राणी ढवळे,शिवाजी पाटील, हैसाजी गाडे,विक्रांत खेडकर, अंकुश कोल्हे,कमलेश कदम, राधाकृष्ण होंगे, प्रल्हाद दुरपडे,बालाजी देशमुख,इंजि.प्रविण जाधव, स्वप्नील शिंदे,अशोक कदम आदिंसह इतरांनी परिश्रम घेतले.

# खेळाडूंचे कुटुंब आता एका अटीवर दुबईला जाणार

भारतीय संघ गुरुवारी चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये आपल्या मोहिमेला सुरुवात करेल. भारताचा संघ या स्पर्धे तील पहिली सामना २० फेब्रुवारी २०२५ रोजी खेळणार आहे. पहिल्या सामन्यात भारतीय संघाला बांगलादेशच्या आव्हानाचा सामना करावा लागेल. मात्र, भारत विरुद्ध बांगलादेश सामन्यापूर्वी भारतीय खेळाडूंसाठी आनंदाची बातमी येत आहे. खरंतर, अलीकडेच बीसीसीआयने आपल्या आदेशात म्हटले होते की, खेळाडू कोणत्याही दौऱ्यावर त्यांच्या कुटुंबियांसोबत राहू शकणार नाहीत, परंतु आता यामध्ये बदल होण्याची चर्चा आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, खेळाडूंचे कुटुंब चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये एक सामना पाहू शकतील.बीसीसीआयने खेळाडूंच्या कुटुंबियांना चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये एक सामना पाहण्याची परवानगी दिली आहे, परंतु यासाठी बीसीसीआयकडून परवानगी घ्यावी लागेल. यानंतर, खेळाडूंचे कुटुंब चॅम्पियन्स ट्रॉफीमधील एक सामना पाहू शकतील. खरंतर, ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीमध्ये भारतीय संघाच्या खराब कामगिरीनंतर बीसीसीआयने एक कठोर निर्णय घेतला होता. परंतु या निर्णयामध्ये आता एक बदल शक्य आहे. बीसीसीआयच्या नवीन नियमांनुसार, जर भारतीय खेळाडू ४५ दिवसांपेक्षा जास्त काळासाठी परदेशी दौऱ्यात त्यांच्या कुटुंबियांसोबत काही वेळ घालवू शकतात. परंतु जर दौरा त्यापेक्षा कमी दिवसांसाठी असेल तर क्रिकेटपटू त्यांच्या कुटुंबियांसोबत वेळ घालवू शकणार नाहीत. बीसीसीआयचा एक अधिकारी म्हणाला की, आता खेळाडूने ठरवायचे आहे की त्याचे कुटुंब कोणत्याही सामन्याला जाणार की नाही. बरेच लोक त्यांच्या कुटुंबियांना थोड्या काळासाठी सोबत घेऊन जाऊ शकत नाहीत. बीसीसीआयच्या नवीन धोरणानुसार, जर संघ ४५ दिवस किंवा त्याहून अधिक काळ भारताबाहेर असेल तर खेळाडूची पत्नी आणि मुले (१८ वर्षांपेक्षा कमी वयाची) जास्तीत जास्त दोन आठवडे त्याच्यासोबत राहू शकतात. लहान टूरमध्ये ही मर्यादा एक आठवडा असते. या धोरणातून कोणत्याही प्रकारचा विचलन झाल्यास प्रशिक्षक, कर्णधार आणि ऑपरेशन्सच्या जीएमची परवानगी आवश्यक असेल.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार २० फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com


# छत्रपती शिवरायांनी भारतीय तत्त्वज्ञाला व लोक कल्याणकारी विचाराला नवी दृष्टी दिली



कल्हे धारूर : १९ फेब्रुवारी येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्ताने प्रयोगशाळा सहायक श्री. सुधाकर नागोराव शिंदे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या निमित्ताने महाविद्यालय व प्रा. व्ही. आर. दाडगे लायब्ररी फाउंडेशन लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने एमजीएम विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथील अशितोष सुनील पाटील यांचे शिवराय समजून घेताना या विषयावरील व्याख्यानातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन कार्याची ओळख विविध उदाहरणांच्या माध्यमातून करून दिली. या निमित्ताने स्वारातीमवि नांदेड येथील ज्ञानस्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी यांनी प्रास्ताविकास कार्यक्रमाच्या आयोजना सभांची भूमिका व्यक्त केली. कार्यक्रमाकरिता उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, डॉ. एल. बी. जाधवर यांबरोबरच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राहुल साळवे यांनी तर आभार ग्रंथपाल श्री. गोपाळ सगर यांनी केल

# सौ.अनुसयाबाई गाढे पाटील यांचे निधन

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट



नांदेड : जोमेगाव (ता. लोहा) येथील सौ.अनुसयाबाई जयशिंगराव गाढे पाटील यांचे बुधवारी (ता. १९) निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७२ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पार्थिव देहावर गुरुवारी (ता. २०) दूपारी एक वाजता जोमेगाव येथे अंत्यसंस्कार होणार आहेत. त्यांच्या पश्चात पती जयशिंगराव गाढे पाटील, मुलगा बालाजी, देवानंद व सहा मुली असा परिवार आहे.

# पिंपळनेर जिल्हा परिषद गटात माजी खासदार प्रितमताई मुंडे यांचा वाढदिवस उत्साहात



शिरूर कासार तालुक्यातील पिंपळनेर जिल्हा परिषद गटाचे अभ्यासू कार्यतत्पर जिल्हा परिषद सदस्य रामदास नाना बडे यांनी बीड लोकसभेच्या माजी खासदार तथा आहिल्यानगर -बीड-परळी रेल्वेच्या शिल्पकार डॉ प्रितमताई गोपीनाथराव मुंडे यांचा वाढदिवस पिंपळनेर जिल्हा परिषद गटात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यामध्ये जिल्हा परिषद शाळा दहिफळेवस्ती येथील विद्यार्थी यांना वही,पेन,गणवेश,ट्राफी ,खाऊचे वाटप करण्यात आले अनावश्यक खर्चाला फाटा देत जिल्हा परिषद सदस्य रामदास नाना बडे यांनी खासदार प्रितमताई गोपीनाथराव मुंडे यांचा अगळा वेगळा वाढदिवस साजरा केला व गेल्या सात वर्षापासुन गरीब विद्यार्थी यांना माजी खासदार प्रितमताई मुंडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शालेय साहित्य वाटप करून प्रोत्सहान देत असतात खासदार प्रितमताई गोपीनाथराव मुंडे यांचा वाढदिवस विद्यार्थी यांना शालेय साहित्य वाटप करून केल्याबद्दल खुद्द माजी खासदार प्रितमताई गोपीनाथराव मुंडे यांनी जिल्हा परिषद सदस्य रामदास नाना बडे यांचे भ्रमणध्वनीवर संपर्क करून कौतुक केले



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त १९ फेब्रुवारी रोजी बीड शहरातील संस्कार बालवाडीतील विद्यार्थीनी कु.आदिश्री दिनेश लिंबेकर हीने राष्ट्रमाता जिजाऊ यांची वेशभुषा साकारून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास अभिवादन केले. समवेत तिची वेशभुषेची तयारी करणारी तिची मोठी बहिण ईश्वरी लिंबेकर

# खा.सुप्रियाताईंना ठेवीदाराचे निवेदन

## जिजाऊ मल्टीस्टेट ठेव घोटाळा ईडी अथवा सी आय डी मार्फत चौकशी करा

बीड : जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट को.ऑ.सो.लि. बीड सुमारे २०० कोटीचा घोटाळा झाला. बीड व धाराशिव जिल्ह्यातील सुमारे ३००० ठेवीरांची लुबाडणूक झाली. तपास अधिकारी पो.नि. खाडे यांनी लाच घेऊन अप्रत्यक्ष आरोपींना मदत केली,तपासाचे तीन तेरा वाजवले. पो.नि.खाडे गेले, गोल्डे आले अद्याप जिजाऊ मल्टीस्टेट मधील मुख्य तिजोरीचा पंचनामा झाला नाही.



अजब तपास होतो आहे. २०२३ मधील गुन्हा फॉरेन्सिक अहवाल सुद्धा आला नाही. मुख्य आरोपी बबन शिंदे यांनी अंग झटकले. पोलीस म्हणतात आरोपींचा बीपी वाढतो.. जास्त चौकशी करता येत नाही. सखोल तपास झाला पाहिजे. या भुमिकेतुन ठेवीदारांचा लढा चालू आहे. घोटाळ्याचा सर्वंकष छडा लावण्यासाठी एऊ अथवा उइख उच्च स्तरीय तपास यंत्रणा मार्फत चौकशी व्हावी. या मागणीचे निवेदन खा.सुप्रिया सुळे यांना ठेवदारांनी दिले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के, खा. बजरंग बाप्पा सोनवणे,आ.संदिप भैया क्षिरसागर यांच्या मार्गदर्शना खाली मस्साजोग ता.केज येथे राष्ट्रवादी नेत्या खा. सुप्रिया सुळे यांची भेट घेऊन...जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट ठेवीदार कृती समितीच्या वतीने ठेव घोटाळा प्रकरणाची चौकशी एऊ अथवा उखऊमार्फत चौकशी करणे बाबत निवेदन देण्यात आले.

# महाशिवरात्री निमित्त कुर्ला येथील महादेव मळी संस्थानावर आजपासून अखंड हरिनाम सप्ताह

# २६ फेब्रुवारीला पद्मश्री गणेश्वरशास्त्री द्रवीड गुरूजी वाराणसी यांची उपस्थीती

## शेळगावकर,आगळे, देवसरकर , पाटील,शिरफुले यांना पुरस्कार

प्रतिनिधी बीड

बीड तालुक्यातील कुर्ला येथील महादेव मळी संगमेश्वर संस्थानावर महाशीवरात्री निमित्त
आज गुरूवार २० फेब्रुवारी २०२५ पासुन अखंड हरिनाम सप्ताहास सुरूवात होत आहे.सकाळी ९ वाजता कुर्ला येथील हनुमान मंदिरावर मिरवणूकीनंतर फुले टाकली जाणार आहे. येत्या बुधवार २६ फेब्रुवारी रोजी वाराणसी येथील पद्मश्री गणेश्वरशास्त्री द्राविड गुरुजी हे उपस्थीत राहणार आहेत.

कुर्ला येथील संगमेश्वर संस्थान महादेव मळी येथे भगवान



बाबा टाकळगांवकर यांच्या अधिपत्याखाली व बबन महाराज मस्के यांच्या हस्ते आज गुरूवार २० फेब्रुवारी २०२५ पासुन अखंड हरिनाम सप्ताहास सुरूवात होत आहे.येत्या गुरूवार २७ फेब्रुवारी पर्यंत हा सप्ताह चालणार आहे. आज गुरूवार २० फेब्रुवारी २०२५ पासुन रात्री ८.३० ते १०.३० या वेळेत शामराव महाराज नेरकर, शुक्रवार २१ फेब्रुवारी रोजी आळंदी येथील कीर्तनकार पांडुरंग महाराज क्षीरसागर, शनिवार २२ रोजी ज्ञानेश्वर महाराज कदम, रविवार २३ रोजी सत्यवान महाराज लाटे, सोमवार २४ रोजी मारुती महाराज तुनतुने, मंगळवार २५ रोजी सच्चिदानंद महाराज कांबेकर, बुधवार २६ रोजी आळंदी येथील यशोधन महाराज साखरे यांची कीर्तने होणार आहेत. येत्या गुरूवार २७ रोजी पुरुषोत्तम उर्फ बबन महाराज मस्के यांचे दुपारी १२ ते २ काल्याचे कीर्तन होणार आहे. कुर्ला पंचक्रोशीतील भाविकांनी महाप्रसाद लाभ घ्यावा असे आवाहन संतोष मोरे यांनी केले आहे

### विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

संगमेश्वर संस्थान महादेव मळी कुर्ला येथे अखंड हरिनाम सप्ताहात काकडा, भजण, शिवलीलामृत पारायण,गाथा भजण, भावार्थ रामायण,हरिपाठ,हरिकिर्तण ,जागर अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असुन या सप्ताह मध्ये परिसरातील भजनी मंडळी येत्या गुरूवार २७ फेब्रुवारी पर्यंत उपस्थिती राहणार आहेत.

### छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा नव्या पिढीसाठी दिशादर्शक: डॉ. महेश गोलेकर

# श्री छत्रपती शिक्षण संकुलात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी.

खर्डा( प्रतिनिधी )


येथील श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाच्या श्री संत गजानन महाविद्यालय व श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने अखंड हिंदुस्तानाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांची ३९५ वी जयंती म ोठ्या उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाली. याप्रसंगी बोलताना संस्थेचे सचिव डॉ. महेश गोलेकर यांनी छत्रपती शिवाजी म हाराज यांचे विचार आत्मसात करणे गरजेचे आहे, आज त्यांच्या कार्यास अनुसरून विविध देशात त्यांच्या प्रशासकीय नीतीचा अवलंब केला जात आहे असे यावेळी सांगितले. त्याचबरोबर पुणे येथील लाल महालात मुंगीलाही आत येता येणार नाही





अशा प्रकारचा चोख बंदोबस्त असताना देखील शाहिस्तेखानाची बोटे कशी कापली या प्रसंगाचे वर्णन केले.
यावेळी खर्डा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्री. रणसिंग लक्ष्मण व प्रा. राजू म्हेत्रे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर आधारित पोवाडा सादर केला याप्रसंगी उपस्थित सर्व रोमांचित झाले.
या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून श्री. सुरेश गोलेकर लाभले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक महाविद्यालयाची उपप्राचार्य प्रा. डॉ. शिवानंद जाधव यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. राजू म्हेत्रे यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालय विद्यार्थी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# आनंत शंकरराव शिनगारे यांना राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार जाहीर



बीड तालुक्यातील येळंब घाट मधील सुपुत्र आनंत शंकरराव शिनगारे यांना त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन तेजस बहुउद्देशीय सामाजिक संस्था नाशिक येथे संस्थेचे अध्यक्ष मेघा ताई डोळस त्यांच्या वतीने दि.०२ मार्च २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार देण्यात येणार आहे हे पुरस्कार राजर्षी शाहू स्मारक सभागृह कोल्हापूर येथे तेजस फाउंडेशन च्या अध्यक्ष मेगा ताई डोळस व संस्थेचे सदस्य यांच्या हस्ते देण्यात येणार आह

# शुक्रवारी बीडमध्ये मोफत मुळव्याध तपासणी महिलांसाठी तज्ञ महिला डॉक्टरांची उपस्थिती

## साहेबराव खेत्रे यांच्या पुण्यस्मरण निमित बीडच्या सुश्रुत मुळव्याध हॉस्पिटलचा उपक्रम

बीड । प्रतिनिधी

मुळव्याधाच्या रुग्णांसाठी मुळव्याध तज्ज्ञ डॉ. अमोल खेत्रे यांनी बीडमध्ये मोफत मुळव्याध तपासणी शिबीराचे आयोजन कै. साहेबराव दगडु खेत्रे यांच्या प्रथम पुण्यस्मरण निमित केले आहे. या शिबीरात तज्ज्ञ डॉक्टरांची टिम पूर्णपणे मोफत तपासणी करणार आहे. विशेष म्हणजे म हिलांच्या तपासणीसाठी तज्ज्ञ महिला डॉक्टरांची उपस्थिती राहणार आहे. हे शिबीर बीड शहरातील जालना रोड येथील सुश्रुत मुळव्याध हॉस्पिटल येथे



शुक्रवार दि. २१ फेब्रुवारी २०२५ रोजी होणार आहे. शिबीरातील रूग्णांना औषध उपचारातही सुट देण्यात येणार आहे.
मुळव्याध-भगंदर-फिशरचे लक्षणे आढळून आल्यास तत्काळ डॉक्टरांकडून तपासणी करुन घेणे गरजेचे आहे. तपासणी न केल्यामुळे मुळव्याध हा आजार वाढतच जातो. आणि त्याचे दुष्परिनाम भविष्यात रूग्णांना सहन करावे लागतात. सुश्रुत मुळव्याध हॉस्पिटल बीडच्या वतीने मुळव्याध- भगंदर-फिशरची मोफत तपासणी शुक्रवार दि. २१ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ यावेळेत करण्यात आले आहे. बीड शहरातील जालना रोड येथील डी.सी. लोढा कॉम्लेक्स, मंत्री बँकेच्या शेजारी असलेल्या सुश्रुत मुळव्याध हॉस्पिटल येथे हे शिबीर आयोजीत करण्यात आले आहे. मुळव्याध-भगंदर-फिशर याचे लक्षणे मलप्रवृत्तीच्या वेळेस किंवा नंतर रक्त पडणे, शौच्याच्या जागेवर आजुबाजुला गाठ येणे, त्यामधून चिकट स्त्रव व रक्त येणे, शौचाच्या जागी आग होणे, वेदणा होणे, टोचल्यासारखे वाटणे, शौचाच्या वेळेस मांसल गोल आकराचा भाग बाहेर येणे इत्यादी लक्षणे असल्यास त्याची तत्काळ तपासणी करुन त्यावर निदान करता येते. मात्र त्याकडे दुर्लक्ष केल्याने हा आजार बळावतो. त्यासाठी तपाणी करुन घेणे अत्यंत गरजेचे आहे. या हॉस्पिटलमध्ये गुदगत आजारांसाठी क्षारसुत्र, क्षारकर्म, आग्रिकर्म सुरक्षित आयुर्वेदिक उपचार पध्दती उपलब्ध आहेत. या शिबीरामध्ये फोनवरही नाव नोंदणी करण्याची

# परळीच्या कृषी उत्पन्न बाजार समिती कडून शेतकऱ्यांची आर्थिक लूट

## भाजीपाला आडत दुकानदाराकडून शेकडा १०% शेतकऱ्यांकडून आडत घेत असलेली रक्कम बंद करावी-वैजनाथ गित्ते

परळी । प्रतिनिधी परळीच्या कृषी उत्पन्न बाजार समितीकडून शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात लूट होत आहे. आधीच शेतीमालाला भाव नसल्याने बळीराजा आर्थिक संकटात सापडलेला असताना कृषी उत्पन्न बाजार समितीकडून मात्र शेतकऱ्यांची मनमानी पद्धतीने लूट होत आहे. शेतकऱ्याकडून दहा टक्के आडत म्हणून रक्कम वसूल केली जात आहे. दरम्यान या प्रकरणी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांना निवेदन ही पाठवण्यात आले आहे. शेतकऱ्यांची होणारे लूट तात्काळ थांबवावी अशी मागणी एका निवेदनाद्वारे बीडचे जिल्हाधिकारी यांना नंदागौळ येथील शेतकरी वैजनाथ ज्ञानोबा गित्ते यांनी केली आहे. याबाबत बीड जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कृषी उत्पन्न बाजार समिती परळी-वै. हे शेतकऱ्यांकडून आपले स्वतःचा भाजीपाला विकण्यासाठी बसलेल्याकडून प्रत्येकी दररोज २० रुपये प्रमाणे वसुली करत आहेत. श्री. सदाभाऊ खोत हे पणन सहकार राज्यमंत्री असताना कोणत्याही शेतकऱ्याकडून शेतकऱ्याच्या कोणत्याही मालावर आडत वसुली किंवा इतर कर लावला जाणार नाही या संदर्भात जा.क्र. पणन-५/कृउबास/अडत/२०१४/४०७० दि.२० डिसेंबर २०१४ चा शासन निर्णय आहे. परंतु मार्केट कमेटीचे कर्मचारी गरीब शेतकऱ्यांकडून प्रत्येकी २० रुपये दररोज करीत असलेली वसूली ८ दिवसांमध्ये बंद नाही केल्यास मा. सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करावे लागेल. जवळपास ३०० शेतकरी दररोज कृषी उत्पन्न बाजार समिती/नगर पालिकाच्या जागेत स्वतः चा भाजीपाला विकतात. त्याप्रमाणे प्रति शेतकऱ्यांकडून २० प्रमाणे दररोज ६००० रुपये वसुली केली जाते. त्याप्रमाणे महिन्याचे १,८०,०००/- रुपये तर वर्षाला २१ लाख ६० हजार रुपये शेतकऱ्यांकडून वसुल केले जातात. तसेच परळी येथील भाजीपाला आडत म्हणून शेतकऱ्यांकडून १० टक्के रक्कम कपात केली जाते. वास्तविक महाराष्ट्रात कोणत्याही ठिकाणी ही आडत आकरल्या जात नाही. मात्र हे सर्व प्रकार फक्त बीड जिल्ह्यातच घडत आहेत. त्यामुळे येथील शेतकरी त्रस्त झाले आहेत. येथील भाजीपाला इतर ठिकाणी घेवून जाण्याची वेळ या शेतकऱ्यांवर येत आहे. तरी मा. सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती परळी वै. जि.बीड याच्यावर शेतकऱ्याची फसवणुकीचा गुन्हा दाखल करून व संबंधित भाजीपाला आडत दुकानदार यांच्यावर सुद्धा शासन निर्णय डावलून शेतकऱ्यांची आर्थिक लूट केल्या प्रकरणी त्यांच्यासुद्धा फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना द्यावेत.अन्यथा परळी कृषी उत्पन्न बाजार समिती समोर आमरण उपोषण करावे लागेल याची गांभीर्याने दखल घ्यावी असेही जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात वैजनाथ गित्ते यांनी म्हटले आहे.

# मयंक चौधरीची लंडन चॅम्पियनशिप साठी निवड

बीड । प्रतिनिधी अबॅकस मधील सर्वोत्कृष्ट विश्वासपात्र सेंटर म्हणजे एम सी पी आय अबॅकस आणि वैदिक मॅथ स्टडी सेंटर असून विद्यार्थ्यांची तयारी करण्यासाठी अबॅकसला अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे. शालेय स्तरावरील सर्वांगिन विकास करण्याच्या मार्गाने अबॅकस गणितीय पध्दतीचा उपयोग होत असून शहरातील अबॅकस ट्रेनिंग केंद्राद्वारे, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय , राज्य स्तरावर, अबॅकस चॅम्पियनशिप आयोजित केल्या जातात. जानेवारी २०२५ मध्ये झालेल्या जागतिक स्तरावरील अबॅकस चॅम्पियनशिपमध्ये मयंक शैलेश चौधरीने चॅम्पियनशिप मध्ये राहणारा आणि अबॅकस लेवल मध्ये सर्वोत्कृष्ट प्रथम ऐतिहासिक यश संपादन केलेले आहे.मयंक शैलेश चौधरीने फक्त पाच मिनिटांमध्ये शंभर प्रश्न सोडवल्यामुळे अभिनंदन होत असून चॅम्पियनशिप रनर अप म्हणून विद्यार्थ्यांचा शहरातील प्रतिष्ठित व्यक्तींद्वारे सत्कार करण्यात आलेला असून २७ मे २०२५ महिन्यामध्ये होणाऱ्या लंडन अबॅकस चॅम्पियनशिपसाठी मयंक शैलेश चौधरीची निवड करण्यात आलेली आहे. वर्ल्ड अबॅकस चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये भारत, ऑस्ट्रेलिया, मलेशिया, अमेरिका, तैवान, चीन, जपान, सिंगापूर अशा जगातील ११ देशातील १९४५ एकूण विद्यार्थ्यांपैकी मयंक शैलेश चौधरीची *चॅम्पियनशिप रनर अप फर्स्ट* यश मिळवून जागतिक स्तरावर निवड झालेली आहे. इंटरनॅशनल अबॅकस स्पर्धेमध्ये ब्रेन किड्स आणि लर्न अँड अर्ण ऑर्गनायझेशन जापान स्तरावरील प्रतिष्ठित समजले जाणारी अबॅकस इंटरनॅशनल सर्वोत्कृष्ट जागतिक विद्यार्थ्यांचे प्रथम यशस्वी विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाच्या कार्यक्रमांमध्ये अबॅकस मास्टर ट्रेनर डॉ घोडके सर प्रमुख अतिथी म्हणून उत्कृष्ट गणितीय शिक्षक श्री कुदळे सर, संतोष शेकडे यांनी सत्कार करून यशस्वी विद्यार्थ्यांचा गेल्या चार ते पाच महिन्यापासून सतत प्रयत्न केल्यामुळे यश मिळालेले आहे

बीड/महाराष्ट्र
महाराष्ट्र विशेष वार्ता
दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार २० फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com


## परळीचे कार्यकारी अभियंता यांचे बँक खाते जप्त अंबाजोगाई न्यायालयाचा आदेश

परळी वैजनाथ : थर्मल पावर स्टेशन परळीच्या २५० मेगावॅट विद्युत निर्मिती प्रकल्पासाठी वडगाव दादाहारी (ता. परळी) येथील जमिनी भूसंपादन फाईल क्र. १६/२००७ अन्वये संपादित करण्यात आल्या होत्या. मात्र, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना या संपादित जमिनींचा मावेजा अत्यल्प दिल्याने त्यांनी बाजारभावानुसार योग्य भरपाई मिळावी म्हणून मे. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर न्यायाधीश, अंबाजोगाई येथे भूसंपादन प्रकरणे (क्र. २६, २७, २८, ३०, ४४, ४५, ४६, ४७, ४८ व ५०/ २०१०) दाखल केली. डिसेंबर २०२२ मध्ये न्यायालयाने संबंधित शेतकऱ्यांच्या अर्जाचा अंशतः स्वीकार करत त्यांना वाढीव मावेजा मंजूर केला. मात्र, थर्मल पावर स्टेशनने हा वाढीव मावेजा शेतकऱ्यांना दिला नाही किंवा न्यायालयात जमा केला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी न्यायालयात वसुली अर्ज (क्र. २८ ते ३२/२०२३) दाखल केले. सुनावणीदरम्यान, कार्यकारी अभियंत्यांना अनेक संधी दिल्यानंतरही त्यांनी शेतकऱ्यांची येणे रक्कम जमा केली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी न्यायालयाला कार्यकारी अभियंता, थर्मल पावर स्टेशन परळी यांच्या बँक ऑफ महाराष्ट्र, टी.पी.एस कॉलनी शाखा परळी येथील खाते जप्त करण्याची विनंती केली. या विनंतीवर दि. ०१ फेब्रुवारी २०२५ रोजी न्यायालयाने थर्मल पावर स्टेशन परळीचे खाते जप्त करण्याचा आदेश दिला. तसेच, बँक ऑफ महाराष्ट्रच्या शाखा व्यवस्थापकांना पुढील आदेशापर्यंत हे खाते जप्त ठेवण्याचे निर्देश दिले. याप्रकरणात, थर्मल पावर स्टेशनकडे निधी उपलब्ध असूनही प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना वाढीव मावेजा दिला गेला नाही, ही मुद्दाम केलेली टाळाटाळ असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. त्यामुळेच न्यायालयाने कठोर निर्णय घेत कार्यकारी अभियंता यांचे खाते जप्त केले. प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची बाजू ॲड. विष्णूपंत सोळंके यांनी प्रभावीपणे मांडली. त्यांना ॲड. रणजित सोळंके, ॲड. रामभाऊ जाधव, ॲड. शिवराज साळुंके यांचे सहकार्य मिळाल

# बीडच्या नाट्यगृहाची दुरावस्था, ज्येष्ठ कलावंत शरद पोंक्षेनी नगरपरिषद प्रशासनाच्या अब्रुची लक्तरे वेशीवर टांगली

### गेल्या वर्षी नाट्यगृह बचाव कृती समितीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर केले होते लक्ष्यवेधी आंदोलन






बीड : बीड शहराचे वैभव असलेल्या शहरातील एकमेव रंगमंच असलेल्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झालेली आहे. दि.१६ रविवारी पुरूष नाटकांच्या सादरीकरणासाठी आलेल्या कलावंतांना झालेल्या गैरसोयीबद्दल बंद वातानुकूलित यंत्रणा, घाणेरडे स्वच्छतागृह, तुटलेले सोफे याबाबत ज्येष्ठ कलावंत शरद पोंक्षे यांनी असुविधांबाबत जाहीर नाराजी बोलावून दाखवत पुन्हा बीडला या नाट्यगृहात नाट्य प्रयोग सादर करण्यासाठी येणार नसल्याचे जाहीर करत नगरपरीषद प्रशासनाच्या अब्रुची लक्तरे वेशीवर टांगली आहेत. त्यामुळे संबंधित प्रकरणात आवश्यक उपाययोजना करण्यात यावी. बीड शहरातील इतर कामांवर कोट्यावधीचा खर्च करणाऱ्या नगरपालिका प्रशासनाला नाट्यगृहाची दुरावस्था दिसत नसल्याने कलाकारांचे हे माहेरघर मोडकळीस येते की काय असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथजी शिंदे, सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांना तक्रार केली आहे. बीड जिल्ह्यातील सर्वात पहिले व सर्वात मोठे असा एकेकाळी नावलौकिक असलेल्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहातील खुर्च्यांची मोडतोड व वातानुकूलित यंत्रणेचा बिघाड, स्वच्छतागृहाची मोडतोड झाल्याने कलावंत नाट्यप्रेमींची कुचंबणा होत असल्याचा आरोप करत नाट्यप्रेमींनी बीड शहराच्या सांस्कृतिक वैभवात भर घालणाऱ्या नाट्यगृहाच्या दुरूस्तीकडे प्रशासन जाणीवपूर्वक कानाडोळा करत असल्याचा आरोप करत नाट्यगृह बचाव कृती समिती नाट्यप्रेमींनी पेटी, ढोलकीच्या तालावर गाणे म्हणत दि. १२ डिसेंबर २०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्षवेधी आंदोलन केले होते.आंदोलनात नाटककार व कलावंत डॉ.सतिश साळुंखे, डॉ.सुधीर निकम, लक्ष्मीकांत दोडके,प्रतिक कांबळे, कैलास शिंदे,गौतम खटोड, मुकुंद धुताडमल, रविराज जेधे, डॉ.उज्वला वनवे, एजाज अली, विनोद दळवी, डॉ.वारे , सुरेश साळुंके, केशव भागवत,देवा दहे,बाळु निसर्गध आदींनी सहभाग घेतला होता.

# ॲड.प्रकाश कवठेकर यांनी दिले पाटोदा तालुक्यातील पत्रकारांना विमा संरक्षण आ.सुरेश धस यांच्या हस्ते वाटप



पाटोदा - डोंगरकिन्ही जि प गटाचे सदस्य, बीड जिल्ह्यातील प्रतिथयश उद्योजक एक विश्वासपात्र बँक चालक प्रकाश कवठेकर यांनी आ सुरेश धस यांच्या वाढदिवसानिमित्त पाटोदा तालुक्यातील सर्व पत्रकारांना प्रत्येकी चार लाख विमा संरक्षण देऊन.आ सुरेश धस यांच्या हस्ते विम्याचे वाटप करण्यात आले. पाटोदा तालुक्यात विभागिय, स्थानिक दैनिकात व काही साप्ताहिकाचे काम करणारे पत्रकार आहेत.ते इमानेइतबारे जनहितासाठी पत्रकारीता करतात, अनेकदा बातम्या साठी हल्ला सहन करावा लागतो.तर ग्रामीण भागात बातम्या संकलीत करताना अनेक अडचणी येतात.यासाठी पत्रकारांना विम्याचे संरक्षण नसते.हेच हेरुन पत्रकारांचे मित्र,जि प सदस्य, प्रतिथयश उद्योजक, विश्वासपात्र बँक चालक ॲड प्रकाश कवठेकर यांनी सर्व पत्रकारांना प्रत्येकी चार लाख व एकुण दोन कोटीचा विम्याचे संरक्षण दिले आहे.आ सुरेश धस यांच्या वाढदिवसानिमित्त पत्रकारांना हे विमा संरक्षण दिले आहे.याच विम्याचे वाटप अद्वैतचंद्र या निवासस्थानी आ सुरेश धस यांच्या हस्ते वाटप करण्यात आले यावेळी प्रकाश कवठेकर, नायगाव चे माजी सरपंच शाहीद सय्यद ,पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा स्विय सहाय्यक सोमीनाथ कोल्हे. ग्रामीण पत्रकार संघाचे अध्यक्ष बबनराव उकांडे, व्हाईस ऑफ मिडियाचे पत्रकार अविराज पवार चंद्रकांत पवार,भाऊ साहेब पवार, दयानंद सोनवणे, अमीर शेख, विजय जाधव, अजिज शेख ,महेशर शेख भाजपा ता अ भागवत येवले, माजी सरपंच रविंद्र राजवण , सय्यद शफ्फु,बावणे बप्पा, पाटोदा नगरसेवक संतोष जाधव, अंमळनेर जि प गटातील नेते भाऊसाहेब भवर, नायगांव चे सरपंच संदीप कवठेकर , तेजस बँक संचालक श्री रामदास ठोसर सर , अंमळनेरचे सरपंच गोविंदशेठ गाडे.यांची उपस्थिती होती.

# महाजनवाडीच्या वार्षिक स्नेहसंमेलनात प्रेक्षक झाले मंत्रमुग्ध



लिंबागणेश-प्रतिनिधी मुलांच्या अंगी विविध कलागुण असतात. या कला गुणांची पारख करता आली पाहिजे. इंस्टाग्राम व फेसबुकच्या या जमाण्यात शाळेतील स्नेहसंमेलन ही आपली जागा टिकवून आहेत. आणि त्याला ग्रामीण भागात उदंड प्रतिसाद मिळत आहे. याचीच प्रचिती महाजनवाडी येथील स्नेहसंमेलनात आली. जि.प.प्राथ. शाळा महाजनवाडी ता. बीड या ठिकाणी ओंकार स्वरुपा या गीतावर हातात दिवे घेऊन देवाची आराधना करणाऱ्या गाण्याने सुरुवात होऊन, पीचली माझी बांगडी, खंडोबाची कारभारीन, मुळीच नव्हते रे कान्हा माझ्या मना अशा श्रवणीय गाण्या बरोबरच महाराष्ट्रातील लोककलाकार वासुदेव गीत, चलावो ना नैनोसे बाण रे, दिल बहलता हैं मेरा आपके आ जाणे से या सारख्या लोकप्रिय हिंदी गीता सोबतच शिवरायांची महती सांगणारे एकच राजा इथे जन्माला, आम्ही शिवकन्या या रोमांचित करणारी गाणी, तसेच आजच्या समाजातील जिवंत प्रश्न म्हणजे स्त्री भ्रूण हत्या वर आधारित नाटिका ने श्रोत्यांची वाहवा मिळवत, महाराष्ट्राची लोककला असलेली लावणी चंद्रा, आता वाजले की बारा, उगवली शुक्राची चांदणी, सांगा ना कशी दिसते मी या नऊवारी साडीवर या सारख्या ठसके बाज लावणीने श्रोत्यांना मंत्रमुग्ध करत स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. चिमुरड्यांनी सादर केलेल्या या कार्यक्रमा करिता गावातील पालकांनी ३८५८० रुपये बक्षीस म्हणून दिले. सदरील कार्यक्रम गटशिक्षणाधिकारी समंदर खान, शिक्षण विस्तार अधिकारी मधुकर तोडकर, केंद्रप्रमुख आबासाहेब हंगे यांच्या प्रेरणेने, मुख्याध्यापक सर्जेराव आंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली तुकाराम माळकर, दीपा जाधव मॅडम, कैलास भवर यांनी गेली १५ दिवस घेतलेल्या अथक परिश्रमाने रामप्रसाद वीर यांच्या साथीने शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, सरपंच, उपसरपंच व महाजनवाडी येथील समस्त ग्रामस्थांच्या सहकार्यातून पार पडल

# ना.पंकजाताई मुंडे त्रिपुराच्या दौऱ्यावर ; बांबू हस्तकला प्रदर्शनाला दिली भेट

मुंबई-प्रतिनिधी महाराष्ट्राच्या हवामान व भौगोलिक परिस्थितीचा विचार करून तसेच शास्त्रीय दृष्टीची सांगड घालून महाराष्ट्र राज्यात बांबू मिशन अंमलबजावणीचा निर्णय घेऊन तो प्रभावीपणे राबवू असं राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी म्हटलं आहे. ना.पंकजाताई मुंडे त्रिपुरा राज्याच्या दौर्यावर असून आज सकाळी त्यांचे आगरताळा विमानतळावर भाजपा महिला मोर्चाच्या अध्यक्षा तसेच शासकीय वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वागत केले. राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ, पर्यावरण विभागाच्या प्रधान सचिव विनिता सिंघल यावेळी त्यांच्यासमवेत उपस्थित होत्या. आगरताळा येथील बांबू लागवड प्रदर्शनाला भेट देऊन ना.पंकजाताई मुंडे यांनी महिलांच्या हस्तकला कौशल्याचे भरभरून कौतुक केले तसेच विविध जातीच्या बांबू लागवडीची यावेळी पाहणी केली. त्रिपुरातील बांबू हस्तकला देशातील



सर्वोत्तम हस्तकलेपैकी एक आहे तसेच अगरबत्ती बनवण्यासाठी बांबूच्या काड्यांसाठी संपूर्ण देशाच्या गरजांपैकी बहुतांशी गरज या राज्यातून पूर्ण केली जाते. बांबू क्षेत्राच्या एकात्मिक विकासासाठी, पीपीपी फ्रेमवर्क अंतर्गत, २००७ मध्ये त्रिपुरा बांबू मिशन (टीबीएम) सुरू करण्यात आले होते. त्रिपुरा बांबू हस्तकला त्यांच्या उत्कृष्ट डिझाइन, विस्तृत श्रेणीतील उत्पादनांसाठी आणि कलात्मक आकर्षणासाठी देशातील सर्वोत्तम मानल्या जातात. या प्रदर्शनात विविध जातीच्या बांबूच्या लागवडीचे आणि हस्तकला कौशल्याची पाहणी केल्यानंतर त्यांनी महाराष्ट्राच्या हवामान व भौगोलिक परिस्थितीचा विचार करून तसेच शास्त्रीय दृष्टीची सांगड घालून महाराष्ट्र राज्यात बांबू मिशनची अंमलबजावणीचा निर्णय घेण्यात येईल असं सांगितलं.

# शिवशाही महानाट्याचा लाभ शिवप्रेमींनी घ्यावा-आ.विजयसिंह पंडित

-प्रतिनिधी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन कार्यावर आधारित शिवशाही या ऐतिहासिक महानाट्याचे तीन प्रयोग शिवजन्मोत्सवानिमित्त आयोजित केले असुन शिवप्रेमी नागरीकांनी त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे. शिवजन्मोत्सवानिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री अलका कुबल, शंतनु मोघे, महानाट्याचे दिगदर्शक महेंद्र महाडिक यांच्यासह राष्ट्रवादी सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. राष्ट्रवादी सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा समितीच्या वतीने बुधवार दि.१९ ते २१ फेब्रुवारी दररोज सायंकाळी ७ वा. र.भ.अट्टल महाविद्यालयाच्या मैदानावर



शिवनगरी येथे शिवशाही या ऐतिहासिक महानाट्याचे विनामुल्य आयोजन करण्यात आले आहे. शुभारंभाचा पहिला प्रयोग सर्वांसाठी असुन गुरुवार दि. २० रोजीचा प्रयोग केवळ महिलांसाठी आणि शुक्रवार दि.२१ रोजीचा प्रयोग शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित केला आहे. या संदर्भात समितीच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत संस्थापक अध्यक्ष आ. विजयसिंह पंडित यांनी सविस्तर माहिती दिली. शिवशाही महानाट्याच्या रंगमंचावर झालेल्या पत्रकार परिषदेला सिने अभिनेत्री अलका कुबल, अभिनेते शंतनु मोघे, दिगदर्शक महेंद्र महाडिक, सिने अभिनेते प्रकाश धोत्रे, महेश कोकाटे, रमेश रोकडे, डॉ. राजेश आहेर, समितीचे अध्यक्ष शैलेश तोष्णीवाल, कार्याध्यक्ष संदिप मडके, सभापती मुजीब पठाण आणि युवानेते रणविर पंडित यांच्यासह समितीचे पदाधिकारी, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. पाच मजली किल्ल्याची हुबेहुब प्रतिकृती, शोभीवंत सिंहासन मेघडंबरी, जहाजाचा वापर करुन महाराजांच्या कोकण मोहिमेचा जिवंत देखावा, भव्य राज्याभिषेक सोहळा, शिवकालीन शस्त्रास्त्रे व युद्ध साहित्य यासह अधुनिक ध्वनी व प्रकाश योजना, घोडे, बैलगाडी, पालखी, नेत्रदिपक अतिषबाजी यांचा वापर करुन मराठा व पातशाही यांच्या तलवारींचा खणखणाट, तोफांचा गडगडाट, अग्नीबाणांचा वर्षाव असा घनघोर रणसंग्राम याच देही पाहण्याचे सौभाग्य गेवराईकर शिवप्रेमींना लाभणार असल्याचे आ. विजयसिंह पंडित यांनी यावेळी सांगितले. पुढे बोलतांना ते म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त डिजेच्या तालावर थिरकनारी मद्यधुंद तरुणाई या माध्यमातुन निर्माण झालेल्या अनिष्ट परंपरा मोडित काढुन खर्या अर्थाने जयंतीचे शिवजन्मोत्सवात रुपांतर करण्याचे काम या माध्यमातुन आम्ही करत आलो आहोत असे आ. पंडित यांनी यावेळी सांगितले. सिने अभिनेत्री अलका कुबल यांनी आ. विजयसिंह पंडित यांच्या कार्याचे कौतुक करुन गेवराई सारख्या ग्रामीण भागातील प्रेक्षकांना या ऐतिहासिक महानाट्याची पर्वणी उपलब्ध करुन दिल्या बद्दल आभार मानले. राजकीय नेते निवडणुक जिंकण्यासाठी असे कार्यक्रम आयोजित करतात मात्र आ. पंडित यांनी निवडुन आल्यानंतर सुद्धा अशा महानाट्याचे आयोजन करणारा आ. विजयसिंह पंडित यांच्यासारखा एकमेव नेता आम्ही पाहिला असल्याचे गौरवोद्गार महानाट्याचे दिगदर्शन महेंद्र महाडिक यांनी काढले. गेवराईच्या मातीतील कलावंताना महानाट्यात काम करण्याची संधी दिल्या बद्दल आ. पंडित यांनी त्यांचे आभार मानले. या महानाट्याचा लाभ सर्व शिवप्रेमी नागरीकांनी घेण्याचे आवाहन या निमित्ताने आ. पंडित यांनी केल

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com